**वादीतर्फे सा.क्र. १ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्रीमती. एस. एस. रत्नवरे यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ३९ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

२. मी शपथपत्रासह खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.
१. गट क्र. ७३७/४ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ४५**
२. फेरफार क्र. ८२४९ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ४६**
सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. टी. बी. डोळसे यांच्यामार्फत :-**

३. हे म्हणणे खरे नाही की, मी पुर्वी केएसबी कंपनी वांबोरी येथे नोकरीस होतो. माझे सासरे तेथे नोकरीस होते. प्रतिवादी मारूती हा सुध्दा केएसबी कंपनीत नोकरीस होता. गट क्र. ७३७/४ हा एकत्रित प्रतिवादीच्या नावाने खरेदी केला हे मला सांगता येणार नाही. तसेच त्याचे क्षेत्र ४० आर असल्यासंदर्भात मला सांगता येणार नाही. वादग्रस्त मिळकतीचे मालक पांडुरंग शंकर पटारे हे होते. गट क्र. ७३७/४ चे एकुण क्षेत्र १ हेक्टर २० आर असल्याबाबत मला माहित नाही. प्रतिवादीच्या नावे घेतलेल्या ४० आर क्षेत्राचे त्याने वाटप करून दिल्याचे मला माहित नाही. सदर ४० आर क्षेत्र प्रतिवादीचे नावे आम्ही इतरांनी खरेदी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर ४० आर क्षेत्राचे वाटप करण्याबाबत आम्ही प्रतिवादी यांना दस्तही करून दिला होता. आता सदर साक्षीदारास दि. २५/०९/१९९९ रोजी करण्यात आलेला दस्त दाखवण्यात आला. सदर दस्तावरमाझी सही आहे. सदर दस्त हा सदर साक्षीदारास उलटतपासात दाखवण्यात आल्या सदर दस्तास **निशाणी क्र. ४**९ देण्यात येते.

४. गट क्र. ७३७/४ मध्ये एकुण २५ सहधारक आहेत. इतर सहधारक प्रस्तुत दाव्यात पक्षकार नाहीत. माझ्या दाव्यात प्रतिवादीने कोणत्या तारखेस अतिक्रमण केले हे नमुद नाही. मी नगर येथे नोकरीस आहे. मी पतसंस्थेमार्फत न्यायालयात दाखल होणा-या वसुली

प्रकरणामध्ये काम पाहतो. वादग्रस्त मिळकतीवर मी सन २००६ साली बांधकाम करून राहत आहे.

प्रश्न - सन २००६ ते दावा दाखल करेपर्यंत तुमचा व प्रतिवादी यांचा अतिक्रमणाबाबत कुठलाही वाद नव्हता ?

उत्तर - मी रहायला गेलो तेंव्हापासून वाद सुरू झाला.

वादग्रस्त मिळकतीच्या मागे मोकळी जागा आहे. वादग्रस्त मिळकतीच्या दक्षिणेला दिलीप काळे राहतात. वादग्रस्त मिळकतीच्या उत्तरेला प्रतिवादी राहतात. पुर्वेस रस्ता तर पश्चिमेस मोकळी जागा आहे. वादग्रस्त मिळकत ही २.५० गुंठे आहे. वादग्रस्त मिळकतीची मोजणी माझ्या समक्ष झाली. मोजणीच्या नोटीसी केवळ मला व वादी सोडून इतरांना गेल्याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याने माझ्या मिळकतीवर कधीही अतिक्रमण केले नाही. गट क्र. ७३७/४ मध्ये केवळ तिघांनीच बांधकाम केलेले आहे. प्रतिवादी, मी व काळे यांनी बांधकाम केले आहे. चोथे यांनी बांधकाम केले असल्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ७३७/४ मध्ये केवळ तिघांनी बांधकाम केले असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ प्रतिवादीला त्रास देण्यासाठी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याने मला दि. ३०/१२/२०१४ रोजी घरात येण्यास हरकत अडथळा केल्याबाबत मल खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही. श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR
Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2025.12.16 17:10:29 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-१६/१२/२०२५. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.